AC – 20.04.2024
Item No. – 5.5 (N) Sem II (1a)

# As Per NEP 2020

# University of Mumbai

| Syllabus for<br>Basket of Minor | |
|---|---|
| **Board of Studies in Marathi** | |
| **UG First Year Programme** | |
| **Semester** | **II** |
| **Title of Paper** | **Credits** |
| **पर्यावरण आणि साहित्य** | **2** |
| **From the Academic Year** | **2024-2025** |

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **Description the course :**<br><br>**Including but Not limited to :** | **पर्यावरण आणि साहित्य**<br>राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० नुसार ‘मुख्य अभ्यासक्रम’ (Major Course) म्हणून मराठी विषय न निवडलेल्या कला तसेच वाणिज्य, विज्ञान अशा विविध अभ्यासशाखांमधील विद्यार्थ्यांना सत्र दोन ते सत्र सहापर्यंत मराठी विषयाचा ‘Minor course’ निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. या पार्श्वभूमीवर पर्यावरणीय समीक्षादृष्टी (Ecocriticism) हा आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन समोर ठेवून ‘पर्यावरण आणि साहित्य’ या अभ्यासपत्रिकेची आखणी करण्यात आली आहे.<br>पर्यावरण ही बाब केवळ नैसर्गिक नाही. माणसांचा सामाजिक, राजकीय हस्तक्षेप पर्यावरणावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव टाकत असतो. पर्यावरणातील विविध घटकांचे सहअस्तित्व जपणाऱ्या तसेच ते नष्ट करू पाहणाऱ्या मानवी प्रवृत्ती आपल्या आजूबाजूला कार्यरत असतात. नैसर्गिक संसाधनांचा अविवेकी वापर आणि संसाधनांवरील हक्कांचे राजकारण यामुळे या संघर्षाला अनेकरेषीयता प्राप्त होत असते. पर्यावरणीय प्रश्न, त्यांच्याशी निगडित विविध दृष्टिकोन आणि निर्माण होणारा संघर्ष इत्यादी संदर्भांना साहित्याने दिलेला प्रतिसाद समजून घेणे, ही या अभ्यासपत्रिकेमागील भूमिका आहे. तसेच विद्यार्थ्यांना समकालीन पर्यावरणीय प्रश्नांबद्दल जागरूक करणे आणि यासंदर्भातील कृतिशीलता वाढविण्यासाठी पूरक वातावरण निर्माण करणे, हेही प्रस्तुत अभ्यासपत्रिकेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. |
| 2 | **Vertical :** | Minor |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit**: | 02 (1 credit = 15 Hours for Theory in a semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 30 Hours |
| 6 | **Marks Allotted**: | 50 Marks |

| | |
|---|---|
| 7 | **Course Objectives**: (List some of the course objectives)<br>१. निसर्ग आणि पर्यावरण या संकल्पना साम्यभेदांसह समजावून सांगणे.<br>२. नैसर्गिक घडामोडी आणि मानवी हस्तक्षेपाचा पर्यावरणाशी असलेला संबंध उलगडून दाखविणे.<br>३. मराठी लेखकांनी पर्यावरणीय समस्या, ऱ्हास आणि जतनाला साहित्यातून दिलेला प्रतिसाद समजावून सांगणे.<br>४. मराठी लेखकांच्या पर्यावरणीय दृष्टीचा परीघ - सामर्थ्य - मर्यादांचा परिचय करून देणे.<br>५. साहित्यातून अधोरेखित होणाऱ्या पर्यावरणीय दृष्टीचे विश्लेषण करता येणे. |
| 8 | **Course Outcomes**: (List some of the course outcomes)<br>१. विद्यार्थ्यांना निसर्ग आणि पर्यावरण या संकल्पना त्यातील साम्यभेदांसह समजतील.<br>२. नैसर्गिक घडामोडी आणि मानवी हस्तक्षेपाचा पर्यावरणाशी असलेला संबंध कळू शकेल.<br>३. मराठी लेखकांनी पर्यावरणीय समस्या, ऱ्हास आणि जतनाला साहित्यातून दिलेला प्रतिसाद समजून घेता येईल.<br>४. मराठी लेखकांच्या पर्यावरणीय दृष्टीचा परीघ - सामर्थ्य - मर्यादांचा परिचय होईल.<br>५. साहित्यातून अधोरेखित होणाऱ्या पर्यावरणीय दृष्टीचे विश्लेषण करता येईल. |
| 9 | **Modules**:- Per credit One module can be created |
| | **Module 1:**<br>**घटक एक :** पर्यावरण आणि साहित्य : तात्त्विक विवेचन |
| | १. निसर्ग आणि पर्यावरण : संकल्पना व साम्यभेद<br>२. पर्यावरणीय समस्या, ऱ्हास आणि रक्षण<br>३. मराठी साहित्यातून अधोरेखित होणारी पर्यावरणीय दृष्टी<br>४. मराठी लेखकांची पर्यावरणीय दृष्टी : परीघ, सामर्थ्य व मर्यादा<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १. |
| | **Module 2:**<br>**घटक दोन : कथा** आणि दीर्घांक |
| | **कथा**<br>१. माणसाची गोष्ट (कमल देसाई)<br>२. सेटलमेंट (संजय लोहकरे)<br>३. केमिकलची बोय आणि सारिंगा (विवेक कुडू)<br>४. वाघूर (सुनील गायकवाड)<br>५. वाळसरा (आसाराम लोमटे) |

| | | |
|---|---|---|
| | **दीर्घांक**<br>१.हंडाभर चांदण्या (दत्ता पाटील)<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १. | |
| **10** | **Text Books:**<br>**NA** | |
| **11** | **Reference Books:**<br>संदर्भसूची :<br>१. पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य, रा.ग. जाधव, स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे, १९९६<br>२. बखर पर्यावरणाची आणि विवेकी पर्यावरणवाद्याची, अतुल देऊळगावकर, मौज प्रकाशन, मुंबई, २००९<br>३. स्त्री आणि पर्यावरण, वर्षा गजेंद्रगडकर, पद्मगंधा प्रकाशन, २०१३<br>४. विश्वाचे आर्त, अतुल देऊळगावकर, मनोविकास प्रकाशन, पुणे, २०१४<br>५. पर्यावरणीय साहित्य : स्वरूप आणि समीक्षा, विनोद गायकवाड, अक्षरदीप प्रकाशन, कोल्हापूर, २०१८<br>६. रंग २, कमल देसाई, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००८<br>७. राब, संजय लोहकरे, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१८<br>८. चार चपटे मासे, विवेक कुडू, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०२२<br>९. कोलदांडा, सुनील गायकवाड, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०२२<br>१०. वाळसरा, आसाराम लोमटे, शब्द पब्लिकेशन्स, मुंबई, २०२३<br>११. हंडाभर चांदण्या (नाट्य संहिता), दत्ता पाटील, नाट्यसंहितेवरील लेख, (संपा.) सतीश बडवे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०२१ | |
| **12** | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination 60% Individual Passing in Internal and External Examination** |
| **13** | **Continuous Evaluation through:**<br>Quizzes, Class Tests, presentation, project, role play, creative writing, assignment etc.( at least 3 ) | **अंतर्गत चाचणी परीक्षा : २० गुण**<br>प्रत्यक्ष उपस्थिती / ऑनलाईन पद्धत<br><br>प्रश्नमंजुषा/चाचणी परीक्षा/ प्रत्यक्ष सादरीकरण /प्रकल्प/ मौखिक परीक्षा/ नियत कार्य (Assignment) यांपैकी कोणत्याही पद्धतीचा अवलंब करून अंतर्गत परीक्षा घेता येईल. |

| | |
|---|---|
| **14** | **Format of Question Paper:** for the final examination<br>बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)<br><br>• एकूण तीन प्रश्न विचारावेत.<br>• प्रत्येक घटकावर अंतर्गत पर्याय असलेले प्रत्येकी १० गुणांचे दोन प्रश्न विचारावेत.<br>• तिसरा प्रश्न हा घटक १ आणि २ वर आधारित दहा गुणांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. |

Sign of the BOS Chairman

Name of the Chairman: **Prof. Satish Kamat**

Name of the BOS: **Marathi**

Sign of the Offg. Associate Dean

Name of the Associate Dean: **Prin. Dr. Suchitra Naik**

Name of the Faculty: **Humanities**

Sign of the Offg. Dean

Name of the Offg. Dean: **Prin. Dr. Anil Singh**

Name of the Faculty**:** **Humanities**